Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

28Th January 2019 Special Issue – 106

# The Changing Role of the Welfare State in the Last Two Decades

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. A.M. More
Dept. of Economics
Vasundhara College, Ghatnandur,
Tq. Ambajogai, Dist. Beed

RESEARCH JOURNEY

Scanned with OKEN Scanner

195

63. शासन आणि कृषी क्षेत्र
**प्रा. डॉ. जाधव मिनाश्री भास्कर** 197

64. भारतीय अर्थव्यवस्था : एक आढावा
**शिंदे मीनाक्षी प्रल्हादराव**
201

65. वैज्ञानिक रोखता गुणोत्तराबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेची बदलती भूमिका
**प्रा.डॉ. रमेश श्रीरंगराव शिंदे**
204

66. शासन आणि कल्याणकारी योजना
**डॉ. साळुंके एस. बी.**
206

67. शेती व्यवसायावरील शासकीय धोरणाचा प्रभाव
**प्रा. चव्हाण विठ्ठल जी.**
208

68. जागतीककिरण आणि जैविक विविधतेबाबत जागतिक स्तरावरील भुमिका व परिणाम
**श्रीमती. सीमा काशिनाथराव धुमाळ**
209

69. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेची फलनिष्पत्ती"
**डॉ.कल्याणकर पी.एम, गवई संघरत्न शिवाजी**

70. महाराष्ट्र शासन आणि लोककल्याणकारी योजना : एक चिकित्सक अभ्यास 212
**प्रा.यादव जे.बी.**

71. जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास 214
**प्रा.शितल नरसिंग पुरी**

Scanned with OKEN Scanner

# शासन आणि कृषी क्षेत्र

**श्रीमती प्रा. डॉ. जाधव मिनाश्री भास्कर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद 413507

**प्रस्तावना :**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही जवळजवळ 67 टक्के लोकांचा उदरनिर्वाह हा शेतीवर अवलंबून आहे. भारतात 70 टक्के लोक ग्रामीण भागात राहतात आणि ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. प्राचीन काळात उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी होती. परंतु सध्याच्या काळामध्ये उत्तम नोकरी, दुय्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती आहे. याचे कारण म्हणजे भारतातील बहुसंख्य शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. भारतात कोरडवाहू जमीनीचे प्रमाण जास्त आहे. नको असताना येणारा पाऊस, चक्रीवादळ, भूकंप, पिकांवर पडणारे रोग यामुळे शेतकऱ्याला फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठीच्या आंदोलनास सकारात्मक प्रतिसाद देत महाराष्ट्र शासनाने 24 जून 2017 रोजी शेतकऱ्यांचे 1.5 लाख रूपयांपर्यंतचे कर्ज सरसकट माफ करण्याचा निर्णय घेतला. 34 हजार कोटी रूपयाच्या कर्जमाफीमुळे 40 लाख शेतकऱ्यांचा उतारा कोरा होईल असे देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर सांगितले. कर्जमाफीच्या या निर्णयास छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना हे नाव देण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचे 30 जून 2016 पर्यंतचे कर्ज थकीत आहे. त्यांना या योजनेचा फायदा मिळणार असून नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 25 हजार रूपये अनुदान म्हणून थेट त्यांच्या खात्यात जमा केले जाणार आहे.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषीला महत्त्वाचे स्थान आहे. विकसित झालेल्या देशात सुद्धा शेतीचे महत्त्व कमी झालेले नाही. देश विकसित झाला असताना सुद्धा वाढत्या लोकसंख्येनुसार अन्नधान्याची आणि कच्चा मालाची मागणी कृषी क्षेत्रातून पूर्ण केली जाते. शेती क्षेत्रात कितीही शोध लावले तरी निसर्गाची साथ महत्त्वाची असते. शेती करण्याबरोबरच शेतीशी संबंधित अनेक पूरक व्यवसाय करून शेतकरी जास्तीचे उत्पन्न प्राप्त करू शकतात. शासनाने कितीही योजना आणल्या, कृषी क्षेत्राला अनुदाने दिली तरी आपल्या सर्वांच्या सहभागातून पर्यावरण संरक्षण व संवर्धन जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत शेतीचा प्रश्न सुटणार नाही. म्हणजेच शेतीचा विकास होणार नाही.

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

1. कृषी क्षेत्राचा सखोल अभ्यास करणे.
2. कृषी क्षेत्रावर शासकीय योजनेचा झालेला परिणाम अभ्यासणे.
3. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहितके :**

1. कृषी उत्पादनात वाढ झाली आहे.
2. कृषी क्षेत्राचा विकास झाल्यावर औद्योगिक क्षेत्राचा विकास झाला आहे.
3. कृषी क्षेत्रातील विकासामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावलेला आहे.

**शासन आणि कृषीक्षेत्र :**

गांधीजींनी सांगितलेल्या तत्वज्ञानाचा वापर खऱ्या अर्थाने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला. शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रधानमंत्री मोदींच्या महत्वकांक्षी घोषणेनंतर सरकारने या दिशेने पाऊले उचलणे सुरू केले. जमीनीचा पोत सुधारण्यासाठी सॉईल हेल्थ कार्ड तयार केले आणि आतापर्यंत 2.5 कोटी शेतकऱ्यांना या कर्जाचे वाटप झाले आहे. शेतीचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रधानमंत्री कृषीसिंचन योजना सुरू करून ती मिशन मोड पद्धतीने म्हणजे सर्वोच्च प्राधान्यक्रम पद्धतीने राबविण्याला सुरूवात केली.

उत्पादन खर्च कमी करण्यासाठी पारंपारिक कृषी विकास योजना सुरू करून जैविक खते वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. सर्वात कमी प्रिमियम, पेरणीपूर्वी आणि कापणीनंतरही विमा संरक्षण ही वैशिष्टये असलेल्या विमा योजनेमध्ये भरपाई देताना आढावा घेण्यासाठी स्मार्टफोन आणि उपग्रहांशी जोडलेले ड्रोनसारखे आधुनिक तंत्रज्ञान वापरले जाणार आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत महाराष्ट्रातील शेतजमीन विमा संरक्षणाखाली आली असून 27 टक्के शेतकरी विमाधारक आहेत. केंद्रीय कृषी खात्याने मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळग्रस्त आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त 10 जिल्ह्यांमध्ये दुग्धविकास प्रकल्प राबविण्यास मंजुरी दिली आहे.

पूर, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट यांसारख्या नैसर्गिक संकटामध्ये शेतीचे नुकसान झाल्यानंतर दिल्या जाणाऱ्या भरपाईचे निकष बदलून रक्कम वाढविण्यात आली. राज्यांच्या आपत्ती निवारण निधीमध्ये 2010-15 या पाच वर्षात मिळालेल्या 33580 कोटी रूपयांवरून 61220 कोटी रूपये अशी दुप्पट वाढ करणे, राज्यांच्या अर्थसहाय्यात वाढ करणे, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून राज्यांना 50 कोटी रूपये देणे यांसारख्या उपाययोजना करण्यात आल्या.

भौगोलिक मर्यादांमुळे शेतीमालाची विक्री करण्यात शेतकऱ्यांना येणारी अडचण दूर करण्यासाठी देशातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांना ऑनलाईन जोडणारे ई-राष्ट्रीय कृषी बाजार म्हणजेच ई-नाम हे व्यासपीठ सुरू केले. आणखी उल्लेखनीय योजना म्हणजे स्मार्ट फोनशी जोडलेल्या कृषी पंपाचे वितरण म्हणजे शेतकऱ्यांना आपल्या स्मार्टफोनद्वारे शेतातील वीजपंप सुरू करून पिकांना पाणी देता येईल.

जागतिकीकरण आणि जागतिक व्यापार संघटनेतील तरतुदीमुळे कृषी मालाच्या विक्रीसाठी जागतिक बाजारपेठ खुली झाली असून कृषी मालाच्या आयात-निर्यातीच्या संधी वाढलेल्या आहेत. कृषी अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात म्हणजेच शेतमालाचे बाजारभाव तसेच शासकीय योजनांचे लाभ थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी शेतकऱ्यांच्या संपूर्ण माहितीचा मास्टर डाटाबेस पणन विभागामार्फत तयार करण्यात येत आहे. या प्रकल्पात अधिकाधिक शेतकऱ्यांनी आपल्या माहितीचा तपशील कृषी उत्पन्न बाजार समितीत ऑनलाईन पद्धतीने नोंदवावा लागतो. प्रधानमंत्र्यांनी 2022 पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा संकल्प केला. शेतमालाला योग्य भाव मिळावा म्हणून कृषी उत्पन्न बाजार



Scanned with OKEN Scanner

समितीच्या कायद्यात सुधारणा केली. कृषी महाविद्यालयांची संख्या वाढवणे, ग्रामीण रस्त्यांचा विकास, सधन कुक्कुटपालन, फिरते पशुवैद्यकीय चिकित्सालय, नानाजी देशमुख कृषी संजीवनी सारखा प्रकल्प असे विविध निर्णय घेऊन शेतकरी हाच केंद्रबिंदू ठेवला आहे.

जोपर्यंत राज्याचा कृषी विकास होणार नाही तोपर्यंत राज्य विषमता मुक्त होणार नाही. राज्याच्या विकासाला योग्य दिशा मिळणार नाही. तसेच आपण शेतीच्या साधनांमध्ये वाढ केल्याशिवाय शेती किफायतशीर ठरणार नाही. कृषी पायाभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढवावी लागेल. तसेच देशभरात प्रगत शेती व मृदा परीक्षण प्रयोगशाळा उभाराव्यात. पीक कर्जाचा व्याजदर कमी 4 टक्के ठेवावा. देशातील 60 टक्के क्षेत्र कोरडवाहू असल्याने सिंचनासाठी धोरणात्मक उपाययोजना कराव्यात. प्रत्येक गावात पाणी पंचायत स्थापन करावी. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणावर होऊन आपोआप औद्योगिक क्षेत्राचा विकास होईल व देशाचा आर्थिक विकास घडून येईल.

**निष्कर्ष :**

1) आज कृषी क्षेत्रामध्ये शेतकरी नवनवीन आधुनिक पिकांचे उत्पादन घेत आहेत. त्यामध्ये पॉलीहाऊस मध्ये जरबेराचे पीक घेत आहेत.
2) महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी विकास कार्यक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यात शेतकरी बचत गआची स्थापना करून शेतकरी उत्पादक कंपन्या सुरू करण्यात आल्या आहेत.
3) जिल्हा कृषी विभागामार्फत उस्मानाबाद जिल्ह्यात जवळ-जवळ 40 कंपन्या आहेत. त्यात पारा, ईटकूर, शिराढोण, कवडेवाडी, पळसप, खामसवाडी आणि उपळाई या गावात प्रत्येक कंपनीत शेतकऱ्यांचे कमीत-कमी 350 शेअर्स आहेत.
4) सध्याच्या काळात उपळाई येथील जरबेरा या फुलाची निर्यात परदेशात होत आहे.
5) त्यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले आहे.
6) शासनाच्या या योजनेमुळे व मोठ्या प्रमाणात अनुदान मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत आहे.
7) महाराष्ट्रात सध्या रेशीम उद्योगाचे देखील उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे.

अशा प्रकारे शासनाच्या विविध योजनेचा कृषीक्षेत्रावर अनुकूल परिणाम झालेला दिसून येतो.

**संदर्भग्रंथ :**

1) कृषी अर्थशास्त्र : वसुधा पुरोहित, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
2) लोकराज्य : ऑगस्ट 2017.
3) लोकराज्य : एप्रिल 2017.
4) लोकराज्य : मे 2017.
5) बुलेटीन ऑफ युनिक ॲकॅडमी पुणे, ऑगस्ट 2017.

Scanned with OKEN Scanner